॥ श्री गजानन प्रसन्न ॥

सा ठे ख त

साठेखत मौजे शेळगी ता उत्तर सोलापूर येथील व शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील एस एम रेसीडेंन्सी मधील सहाव्या मजल्यावरील फ्लॅट नं ६६ च्या ओनरशिप फ्लॅट जागेचे खरेदी किंमत रुपये २५,००,०००/- अक्षरी रुपये पंचवीस लाख फक्त यापैकी इसारा रक्कम रुपये १,५०,०००/- अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त

बा मु रु २४,६६,०००/- वि क्र ३६/१३६ दर रु २३४८०/- दि. ७/२/२०१७

लिहून घेणार -

श्री विनायक अशोक कटके - पॅन नं. CHYPK2634P

वय वर्षे २९ धंदा व्यापार

रा. १०/१८, भवानी पेठ, सोलापूर.

लिहून देणार -


श्री श्रीशैल सिद्रामप्पा माकणे - पॅन नं. AICPM8153G

वय वर्षे ५० धंदा व्यापार

रा प्लॉट नं. ३८ मेहताब नगर शेळगी सोलापूर.

कारणे खरेदीखत ओनरशिप फ्लॅट जागेचे लिहून देतो ते येणेप्रमाणे -

१. मिळकतीचे वर्णन - डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे शेळगी येथील जागा यांसी सर्व्हे नंबर २०/२अ/१ यास हल्ली सिटी सर्व्हे नंबर ६३५ पैकी प्लॉट नं. १, २, ३ याचे एकूण क्षेत्र ३४५९.५६ चौ.मी इतके आहे. प्लॉट नं १, २, ३, वर एस एम रेसिडेंन्सी म्हणून ओनरशिप अपार्टमेंट ॲक्ट प्रमाणे इमारत बांधलेली असुन त्या एस एम रेसिडेंन्सी असे नाव दिलेले आहे त्याचे घोषणापत्र दि. ३०/०१/२०१२ रोजी दस्त नं ५८८ ने झालेले आहे. त्या घोषणापत्राच्या चुकीची दुरुस्ती दि. १६/०७/२०१५ रोजी दस्त



नं ४९७९ ने झालेली आहे. सदर चुकदुरुस्तीच्या दस्ताची फेर चुकदुरुस्ती दस्त नं. ४९९८ दि. १७/०७/२०१५ रोजी झालेली आहे. त्याचे एकूण क्षेत्र ३४५९.५६ चौ.मी.अशी दुरुस्ती केलेली आहे. सदर जागेवर महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट प्रमाणे सोलापूर महानगरपालिकेकडून दिनांक २८/०९/२०११ रोजी बांधकाम परवानगी क्र ८७४ ने बांधकाम केले असून या संपूर्ण इमारतीस एस. एम. रेसिडेंन्सी या नावाने संबोधले आहे या इमारतीमधील सहाव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ६६ ची जागा याचे चटई क्षेत्र ६५.०० चौ.मी. याचे सुपर बिल्टअप क्षेत्र १००.०६ चौ.मी. इतके आहे._यामध्ये खाली नमूद केलेप्रमाणे बांधकाम केले आहे.

लिव्हींग रुम	-	३.७० X ४.८८	-	१८.०५ चौ.मी. ✓
मेर बाल्कनी	-	३.७० X १.२०	-	४.४४ चौ.मी. ✓
किचन रुम	-	३.१३ X २.४०	-	७.५१ चौ.मी. ✓
मेर बाल्कनी	-	२.४० X १.२०	-	२.८८ चौ.मी. ✓
पॅसेज	-	०.९८ X ३.३४	-	३.२७ चौ.मी. ✓
टॉयलेट	-	२.३० X १.३०	-	२.९९ चौ.मी. ✓
टॉयलेट	-	२.३० X १.३०	-	२.९९ चौ.मी. ✓
बेडरुम	-	३.१३ X ३.०४	-	९.५१ चौ.मी. ✓
मेर बाल्कनी	-	३.०४ X १.२०	-	३.६४ चौ.मी. ✓
चटई क्षेत्र			-	६५.०० चौ.मी.
एरिया अंडर वॉल ॲण्ड कब			-	६.८० चौ.मी.
निव्वळ बांधकाम क्षेत्र			-	७१.८० चौ.मी.
ॲड १/२ ओपन टेरेस			-	५.१७ चौ.मी.
एकूण बांधकाम क्षेत्र			-	६९.१३ चौ.मी.
ॲड प्रपोशनेट कॉमन एरिया				
स्टेअर पास लिफ्ट १/२ पार्किंगसह			-	२३.०९ चौ.मी.
एकूण सुपर बिल्टअप क्षेत्र			-	१००.०६ चौ.मी.

सपउ-२
३७८ | ४ | ३०
२०१७

याप्रमाणे बांधकाम केले आहे यात नळ, नळाचे कनेक्शन इले लाईटचे कनेक्शन व फिटींगसह आहे. यांसी चतु:सीमा

पुर्वेस - फ्लॅट नं ६७

दक्षिणेस - नटराज सोसायटी

पश्चिमेस - फ्लॅट नं ६५

उत्तरेस - पॅसेज

येणेप्रमाणे चतु:सीमेतील सहाव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ६६ ची जागा यातील असलेल्या संपूर्ण बांधकामासह वगैरे तदंगभुंत वस्तुसह व वहिवाटीचे इजमेंटचे सर्व हद्दीहक्कासह व पुर्वापार चालत आलेल्या वहिवाटीचे इजमेंटचे सर्व हक्कासहसदरची ओनरशिप फ्लॅट जागा माझे मालकी व कब्जे वहिवाटीत आहे सदर जागेचे माझेशिवाय दुसरे कोणीही मालक नाहीत अशी मी तुम्हास खात्री देतो सदर ओनरशिप फ्लॅट जागेचे रजि साठेखत आजरोजी मी तुम्हास लिहून नोंदवून दिले आहे.

वर वर्णन केलेली फ्लॅट जागा आजरोजी मी तुम्हास कायम खुषखरेदी रक्कम **रुपये २५,००,०००/- अक्षरी पंचवीस लाख फक्त इतक्या लिहून देण्याचे कबूल करुन त्यापैकी या साठेखताने इसारा रुपये १,५०,०००/- अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त** मला भरणा या सदरात नमूद केलेप्रमाणे मिळाला. याबाबत काही तक्रार नाही. या साठेखताने इसारा दिलेली रक्कम वजा जाता राहिलेली रक्कम तुम्ही मला खरेदीखताचे वेळी देण्याचे ठरले आहे.

सदर फ्लॅट जागेचे खरेदीखत हे आजपासून **११ (अकरा)** महिन्याचे मुदतीत करण्याचे आहे. याचे बंधन दोघा उभयतांवर बंधनकारक आहे व राहील. सदर मुदतीत जागेचे खरेदीखत मी तुम्हास करुन न दिल्यास तुम्हास कोर्टमार्फत खरेदीखत करुन घेण्याचा पूर्ण अधिकार आहे व राहील.

सपउ-२
३७८ | ५ | ३०

याचे होणारे नुकसानीस मी जबाबदार आहे. सदर जागेचे खरेदीखत हे वरील मुदतीत तुम्ही करुन न घेतल्यास मी तुम्हास कोर्टमार्फत खरेदीखत करुन घेण्यास भाग पाडेन त्याचे होणारे नुकसानीस तुम्ही जबाबदार राहाल.

सदरजागेचे खरेदीखतापर्यन्तचे बिनशेती सारा, म्यु पल कर, इले बिलाची रक्कम, व्हॅट, टॅक्स व इतर कर हे मी देण्याचे आहेत. सदर जागेचा आजरोजी होत असलेल्या रजि. साठेखताचा संपूर्ण खर्च व यापुढे होणारा खरेदीखताचा संपूर्ण खर्च लिहून घेणार यांनी केला आहे व करण्याचा आहे. सदर वर नमूद केलेल्या संपूर्ण जागेचा प्रत्यक्ष कब्जा मी तुम्हास खरेदीखताचे वेळी कायमचा मालकी हक्काचा करुन देण्याचा आहे व तो मी तुम्हास देईन

सदर जागा ही निर्वेध व निजोखमी आहे त्यावर कोणाचा कोणत्याही प्रकारचा बोजा, टांच, जप्ती वगैरे कांही एक नाही आणि ही जागा मी दुसरे कोणासही गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी मृत्युपत्र करार वगैरे अन्यदस्ताने लिहून देवून गुंतविलेली नाही अशी मी तुम्हास खात्री देतो

सदर फ्लॅट जागा तुम्ही पाहिलेली आहे सदर जागा ही तुम्हास पसंत पडलयाने व राहण्यासाठी योग्य असल्याने व तुमचेकडून मला बाजारभावाप्रमाणे योग्य किंमत आल्यामुळे तुम्हासच या दस्तान्वये कायम खुषखरेदी लिहून दिली आहे.

सदर मिळकतीच्या कायदेशीर प्रमाणाबाबत लिहून घेणार यांनी स्वत: कायदेतज्ञमार्फत रितसर शोध घेतला असुन भविष्यात कोणताही वाद/दावा/ तक्रार निर्माण झाल्यास लिहून देणार व लिहून घेणार हे जबाबदार राहणार आहेत. इतर अधिकारातील शेऱ्यात असणाऱ्या प्रत्येक शेऱ्या संदर्भात आम्ही लिहून देणार व लिहून घेणार हे जबाबदार असून त्यांची पूर्ण कल्पना आम्ही लिहून देणार व लिहून घेणार यांना आहे. नोंदी अथवा त्यांच्या पुर्तता संदर्भात आम्ही लिहून देणार व लिहून घेणार हे जबाबदार राहु.

सपउ-२
३७८ | ६ | ३०
२०१७

आम्ही लिहून देणार व लिहून घेणार हे भारतीय नोदणी नियम व कायदा तसेच महाराष्ट्र नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ आणि इतर शासकीय विभागीय काढलेल्या नियम व कायद्याला अनुसरून बाधील राहु. कोणत्याही शासकीय विभाग अथवा कार्यालय अथवा कार्यालय कर्मचारी त्यास जबाबदार राहणार नाही.

लिहून देणार व लिहून घेणार हे जबाबदार राहतील लिहून देणार / लिहून घेणार साक्षीदार व ओळखदार आम्ही सर्वजण एकमेकांना ओळखतो व सदरचा दस्तातील मजकुर लिहून देणार व लिहून घेणार यांचे सांगणेवरुन व त्यांनी सदरचा दस्तातील मजकूर संपूर्ण वाचून पाहिलेला असून तो त्यांना मान्य व कबुल असल्याने त्यांनी साक्षीदारासमक्ष सहया केलेल्या आहेत.

सदर जागा निर्वेध व निजोखमी आहे किंवा नाही याची खात्रीसाठी म्हणून तुम्ही तुमचे वकिला मार्फत जाहिर नोटीस प्रसिध्दीकरण करु शकता यास माझी कोणतीही हरकत वा तक्रार नाही यास माझी पुर्ण संमती आहे. वकीलाकडून मिळालेला आहे तो साठेखताचे दस्तास जोडलेला आहे. तसेच सदर जागेचे खरेदीखत मी तुम्हास तुमचे नांवे अगर तुम्ही सागाल त्यांचे नांवे लिहून देईन सदर जागेचे खरेदीखत होईपावेतो तुमचे मालकी हक्कास हगर कब्जे वहिवाटीस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत वगैरे आल्यास मी माझे स्वखर्चाने दूर करुन देईन त्याची तोषिस तुम्हास लागू देणार नाही.

या साठेखताचा भरणा पावला तो असा

रुपये १,५०,०००/- अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त आजरोजी मला तुमचेकडून साक्षीदारासमक्ष रोख मिळाले तक्रार नाही. सदर साठेखतामधील मजकुर लिहून देणार व लिहून घेणार यांन दिलेल्या माहितीवरुन तयार करुन दिले.

सपउ-२
३७८ | ७ | ३०
२०१७

हे साठेखत आजरोजी लिहून दिल दि.७/१/२०१७ .





लिहून देणार सही

श्री श्रीशैल सिद्रामप्पा माकणे



लिहून घेणार सही

श्री विनायक अशोक कटके


साक्षीदार



१.



श्रीशैलेश सि. माकणे
गोविंदनगर शेळगी
सोलापूर





सपउ-२
३७८ | ८ | ८०
२०१७



